## प्रसिध्दीपत्रक दि. ०९/०९/२०२३

**विषय :- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक शाखा कार्यालय, येरवडा येथे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात आयोजित केलेल्या "राष्ट्रीय लोकअदालतबाबत"**

'जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे' यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात असलेले प्रलंबित चलन केसेसचा निपटारा करणे करीता पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय, बंगला नं. ६, येरवडा पोस्ट ऑफिस शेजारी, पुणे येथे दि. ०९/०९/२०२३ रोजी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली मा. श्री. श्याम चांडक, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, पुणे यांचे शुभहस्ते राष्ट्रीय लोकअदालतचे उद्घाटन करण्यात आले होते.

लोकअदालत मध्ये प्रस्ताविक श्री. विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांनी केले. प्रस्ताविक मध्ये वाहतूक खटल्यांची निर्गती करण्याच्या धोरणासोबतच वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर व श्री. श्याम चांडक, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, पुणे यांनी जिल्हा यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे व वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी सुरु केलेल्या हेल्पडेस्क बद्दल समाधान व्यक्त केले. लोकअदालत उद्घाटन कार्यक्रमास मा. आमदार श्री. सिध्दार्थ शिरोळे, विधानसभा सदस्य, शिवाजीनगर मतदार संघ व मा. श्री. रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर तसेच सुमारे १५०० जनसमुदाय उपस्थित होता.

लोकअदालतमध्ये जास्तीत जास्त खटल्यांचा तडजोडीव्दारे तात्काळ निपटारा व्हावा या करीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचेतर्फे १९ न्याय दंडाधिकारी व त्यांचे सहकारी यांचे १९ डेस्कचे नियोजन करण्यात आले होते. लोकअदालतीस नागरिकांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद देवून आपले वाहनांवर प्रलंबित खटल्यांची दंडात्मक रक्कमेमध्ये तडजोड करुन तडजोड रक्कम अदा केली आहे. लोकअदालतमध्ये वाहनधारकांनी तडजोड केलेल्या रकमांच्या जी.एन. पावत्या नागरिकांना १० दिवसांनंतर मोटार व्हेईकल कोर्ट, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी देण्यात येणार आहे.

तरी नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लोकअदालतीमध्ये तडजोडीअंती भरलेल्या दंडाच्या रकमेची जी.एन. पावती १० दिवसांनंतर मोटार व्हेईकल कोर्ट, शिवाजीनगर पुणे येथुन प्राप्त करुन घ्यावी.

पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर